क्र.CIC/अ.क्र.६५९४/२०२६

श्री. राजु कारभारी आहिरे.
नविन रेशनिंग दुकानाजवळ,
भिमनगर, सर्वोदय हॉस्पीटलच्या मागे,
घाटकोपर (प), मुबंई. 400086.

विरुद्ध

जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते) पूर्व उपनगरे 'एन' विभाग
पंतनगर गॅरेज इमारत, पंतनगर आगाराच्या मागे, पंतनगर,
४ था मजला, घाटकोपर (पूर्व), मुंबई ४०० ०७५.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (रस्ते) पूर्व उपनगरे 'एन' व 'एम/पूर्व' विभाग
पंतनगर गॅरेज इमारत, पंतनगर आगाराच्या मागे, पंतनगर,
४ था मजला, घाटकोपर (पूर्व), मुंबई ४०० ०७५.

द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०५.०८.२०२६

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

मूळ अर्जाचा दिनांक	जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक	प्रथम अपीलाचा दिनांक	प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक
०५.०३.२०२१	०९.०४.२०२१	२३.११.२०२१	११.०१.२०२२

अपिलार्थीनी दाखल केलेल्या दिनांक ०५.०३.२०२१ रोजीच्या जोडपत्रानुसार एई-१०१ या शीर्षकांतर्गत परचेस ऑर्डर क्रमांक ४१०००४९९२४ नुसार आर.बी.मेहता रोड, घाटकोपर (पूर्व) या रस्त्याच्या कामासंदर्भात सहाय्यक अभियंता, एन विभाग, पूर्व उपनगरे यांच्याकडे माहिती मागितली असता तत्कालीन जन माहिती अधिकारी (रस्ते) पूर्व उपनगरे, एन विभाग श्री.चं.वि.माने यांनी उपलब्ध असलेल्या माहितीच्या एकूण ३७० छायांकित प्रती असून सदर प्रती प्राप्त करण्याकरता ₹ ७४०/- चा भरणा करण्याबाबत अपिलार्थीना सुचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीनी ₹ ७४०/- इतकी रक्कम भरणा देखील केलेली आहे व याबाबतीत त्यांनी सहाय्यक अभियंता, एन विभाग यांना सुचित देखील केलेले आहे व त्यानंतर त्याचा वारंवार पाठपुरावा देखील केलेला आहे असे आढळून येते. तथापि, त्यानंतरही माहिती प्रदान न केल्यामुळे दिनांक २३.११.२०२३ रोजी प्रथम अपिल अर्ज

दाखल केला त्यावर तत्कालीन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, रस्ते यांनी दिनांक ११.०१.२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशात जन माहिती अधिकाऱ्यांनी अपिलार्थीना विहित कालावधीत उत्तर दिले आहे. तथापि, ७ दिवसात माहिती देण्यात यावी असे आदेश पारित करून सदर अर्ज निकाली काढलेला आहे, याचेही अनुपालन झाले नसल्याचा आक्षेप नोंदवीत तसेच शुल्काचा भरणा केल्यापासून १८० दिवस व अपिलीय अधिकाऱ्यांनी आदेश देवूनही माहिती प्राप्त न झाल्यामुळे दिनांक १३.०५.२०२२ रोजी प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज दाखल केलेला आहे.

याप्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी यानंतरही वारंवार पाठपुरावा केल्यानंतर कुठलीही माहिती प्रदान केलेली नाही. ही बाब लक्षात घेता प्रस्तुत **जोडपत्र अ** हा मंजूर करण्यात येत असून अपिलार्थींनी भरलेले ₹ ७४०/- इतके शुल्क हे त्यांना तात्काळ परत करण्यात यावे. तसेच त्यांच्या जोडपत्रामध्ये नमूद केलेली माहिती ही **कलम ७ (२)** अन्वये त्यांना विहित मुदतीत प्रदान न केल्यामुळे नाकारली आहे असा निष्कर्ष काढणे क्रमप्राप्त असून **कलम ७ (६)** प्रमाणे उपरोक्त माहिती विनामूल्य प्रदान करावी तसेच प्रस्तुत प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांची संपूर्ण कृती असमर्थनीय असून माहिती अधिकाऱ्यांच्या मूळ उद्देशाला छेद देणारी असल्याची वस्तूस्थिती लक्षात घेता **कलम १९ (८) (ग) व २० (१)** अन्वये त्यांच्यावर झालेल्या जवळजवळ ५ वर्षांच्या विलंबा बाबत ₹ २५,०००/- इतकी शास्ती **कलम १९ (८) (ग) व २० (१)** प्रमाणे करणे क्रमप्राप्त असून असे करण्यापूर्वी नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरून तसेच **कलम २० (१)** मधील तरतुदीनुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.चं.वि.माने यांना त्यांचा खुलासा सादर करण्याची एक संधी नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरून देण्यात येत असून **कलम २० (१)** मध्ये नमूद केल्याप्रमाणे झालेल्या विलंबा बाबत केलेली कृती ही वाजवी होती हे शाबित करण्याची जबाबदारी ही तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांची असल्याची तरतूद लक्षात घेता **तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांचा सविस्तर लेखी खुलासा विहित मुदतीत सादर करावा अन्यथा त्यांना याबाबतीत काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरून कलम कलम १९ (८) (ग) व २० (१) अन्वये पुढील कारवाई करण्यात येईल.**

आदेश

१. **वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
२. **अपिल क्र.६५९४/२०२६ निकाली काढण्यात येत आहे.**

स्वाक्षरीत/-
(राहुल भा.पांडे)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : ०५.०८.२०२६